मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नालेसफाईबाबत महापालिकेने घेतला मोठा निर्णय

## यंदा जेसीबी आणि स्पायडर मशिनच्या साहाय्याने सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील नालेसफाईला सुरुवात करण्याची सूचना आरोग्य विभागाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांना केली आहे. एप्रिलअखेरपर्यंत नालेसफाई पूर्ण केली जाणार आहे.शहरामध्ये दोन ते ११ मीटर रुंदीचे १०० किलोमीटर अंतराचे १४३ नैसर्गिक नाले आहेत. हे नाले शहरातील पवना, मुळा व इंद्रायणी या नद्यांना जाऊन मिळतात.

नाले उघडे असल्याने या नाल्यांमध्ये राडारोडा, प्लास्टिक, भंगार व टाकाऊ साहित्य टाकले जाते. अनेक नागरिक घरगुती कचरा या नाल्यांमध्ये टाकतात. गाळ साचल्याने नाले अरुंद व उथळ होतात. परिणामी, पावसाळ्यात पाणी वाहून नेण्याची त्यांची क्षमता कमी होते. पावसाळ्याचे पाणी वाहून न गेल्याने ते साचून परिसरातील घरे व दुकानांमध्ये शिरते.

पावसाळ्यामध्ये शहरात पूरस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून



आरोग्य विभागाकडून दर वर्षी सर्व नाले, पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या, चेंबर आणि गटारे स्वच्छ केली जातात.गेल्या वर्षी पावसाळ्यात चिखली, रूपीनगर, नवी सांगवी, जुनी सांगवी, पिंपरीतील भाटनगर, दापोडी भागातील घरांमध्ये पुराचे पाणी शिरले होते.

त्यामुळे शेकडो नागरिकांचे स्थलांतर करण्याची वेळ महापालिकेवर आली होती. यंदाच्या पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी महापालिकेने विशेष खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. नालेसफाईला सुरुवात करण्याबाबत स्थापत्य विभाग व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यामुळे शेकडो नागरिकांचे स्थलांतर करण्याची वेळ महापालिकेवर आली होती. यंदाच्या पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी महापालिकेने विशेष खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. नालेसफाईला सुरुवात करण्याबाबत स्थापत्य विभाग व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

जेसीबी, पोकलेन व स्पायडर मशिनने नालेसफाई केली जाईल. अरुंद नाल्यांच्या ठिकाणी यंत्रे जात नाहीत. अशा नाल्यांमध्ये सुरक्षेची सर्व साधने वापरून मनुष्यबळाद्वारे सफाई करण्यात येणार आहे. नालेसफाईपूर्वीची व नंतरची छायाचित्रे घेतली जातील. नालेसफाईचा आढावाही घेण्यात येणार आहे. नालेसफाईचे काम ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्तडॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

### पूर टाळण्यासाठी महापालिकेची तयारी

**» पिंपरी-चिंचवड शहरातील १४३ नैसर्गिक नाल्यांची स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरातील पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांना मिळणाऱ्या या नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ, प्लास्टिक आणि कचरा साचलेला आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाणी वाहून नेण्याची क्षमता कमी होते. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने एप्रिलअखेरपर्यंत सर्व नाले स्वच्छ करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या आहेत.**

### क्षेत्रीय कार्यालय – नाल्यांची संख्या

| | |
|---|---|
| » अ – २५ | » इ – १६ |
| » ब – १५ | » फ – १८ |
| » क – २८ | » ग – ९ |
| » ड – १२ | » ह – २० |

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाजवळ ट्रान्सफॉर्मरचा भीषण स्फोट

## अग्निशामक दलाने वेळेत घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवल्याने मोठा अनर्थ टळला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय परिसरात शनिवारी सायंकाळी ट्रान्सफॉर्मरचा भीषण स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली. सायंकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास झालेल्या या स्फोटामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. मात्र, अग्निशामक दलाने वेळेत घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवल्याने मोठा अनर्थ टळला.



मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस आयुक्तालयाजवळील एका इमारतीबाहेरील ट्रान्सफॉर्मरमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाला. या बिघाडामुळे जोरदार स्फोट होऊन ट्रान्सफॉर्मरने पेट घेतला. स्फोटाचा आवाज मोठा असल्याने परिसरातील नागरिक घाबरून घराबाहेर आले. आगीच्या ज्वाळा शेजारील इमारतीच्या पार्किंगपर्यंत पोहोचल्याने तेथील वाहनांना धोका निर्माण झाला होता.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड अग्निशामक दलाच्या तीन गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी तत्परतेने पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळवले. त्यांच्या जलद कारवाईमुळे आग इमारतीच्या वरच्या मजल्यांपर्यंत पसरण्यापासून रोखली गेली.

### वीजपुरवठा खंडित..

**» घटनेनंतर खबरदारीचा उपाय म्हणून महावितरणकडून परिसरातील वीजपुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आला. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी ट्रान्सफॉर्मरचे मोठे नुकसान झाले आहे. घटना वर्दळीच्या ठिकाणी घडल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू होते.**

# पिंपरी-चिंचवडच्या ‘सखी आंगण’ उपक्रमाचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

## आमदार अमित गोरखे यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेऊन सोपवले शुभेच्छा पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत आकुर्डी रेल्वे स्थानक परिसरात राबविण्यात आलेल्या ‘सखी आंगण’ या महिला सक्षमीकरणाच्या अनोख्या उपक्रमाची दखल राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी घेतली आहे. या उपक्रमाबद्दल मुख्यमंत्र्यांनी महापालिका प्रशासन आणि सहभागी महिला बचत गटांचे विशेष कौतुक करत आमदार अमित गोरखे यांना शुभेच्छा पत्र पाठवले आहे. हे सन्माननीय पत्र आमदार गोरखे यांनी आज नवनियुक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांच्याकडे सुपूर्द केले.

यावेळी आमदार अमित गोरखे यांनी डॉ. विजय सूर्यवंशी यांचे आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल अभिनंदन केले. या भेटीदरम्यान शहरातील नवीन विकासकामे, पायाभूत सुविधा, वाहतूक शिस्त आणि कायदा व सुव्यवस्था यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, ई-लिलाव प्रक्रियेच्या माध्यमातून ४९ गाळ्यांचे महिला बचत गटांना वाटप करून त्यांना सुसज्ज, सुरक्षित व सन्मानजनक व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.



### महिला सक्षमीकरणाचा ‘आकुर्डी पॅटर्न’

**» आकुर्डी रेल्वे स्थानक परिसरात ई-लिलाव प्रक्रियेद्वारे ४९ गाळ्यांचे वाटप महिला बचत गटांना करण्यात आले आहे. या केंद्रात खाद्यपदार्थ, हस्तकला आणि घरगुती वस्तूंच्या विक्रीसाठी सुसज्ज व सुरक्षित व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.**

### व्यवसायाची थेट संधी

**» या उपक्रमावर भाष्य करताना आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, ई-लिलाव प्रक्रियेच्या माध्यमातून ४९ गाळ्यांचे महिला बचत गटांना वाटप करून त्यांना सुसज्ज, सुरक्षित व सन्मानजनक व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून महिलांना खाद्यपदार्थ, हस्तकला आणि घरगुती वस्तूंच्या व्यवसायाची थेट संधी मिळाल्याने त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यास मोठी मदत होणार आहे. विशेष म्हणजे, या केंद्राचे सुशोभीकरण आणि प्रसिद्धी करताना डिझायनिंग व मार्केटिंग क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिलेले योगदान अत्यंत कौतुकास्पद आहे. तसेच, ‘सखी आंगण’मधील भिंतींवर साकारण्यात आलेले महाराष्ट्रातील थोर महिलांचे कार्य आणि विदर्भातील पारंपरिक ‘गोंडी चित्रकले’चे दर्शन यामुळे हा प्रकल्प व्यावसायिकतेसोबतच सांस्कृतिकदृष्ट्याही समृद्ध झाला आहे.**

**“ मुख्यमंत्री महोदयांनी ‘सखी आंगण’ उपक्रमाचे कौतुक करणे, ही संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. हा प्रकल्प केवळ व्यावसायिक नसून महिलांच्या कौशल्य विकासाचे आणि आत्मविश्वासाचे केंद्र बनला आहे. डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड महानगरपालिका विकासाच्या प्रगतीपथावर असेल, असा आम्हाला विश्वास आहे.**

**- अमित गोरखे, आमदार**

# पिंपरीतील शगुन चौक सिग्नल बंद; वाहतूक कोंडी वाढली

## बाजारपेठेतील गर्दीमुळे वाहनांच्या लांब रांगा; सिग्नल दुरुस्तीची प्रतीक्षा, वाहनचालक हैराण

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी शहरातील वाहतूक नियंत्रित करण्याच्या उद्देशाने शगुन चौकात बसवलेली सिग्नल यंत्रणा बरेच दिवस झाले बंद आहे. या वर्दळीच्या ठिकाणी असलेली सिग्नल यंत्रणा बंद पडल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. झुलेलाल मेन बाजाराच्या मध्यवर्ती भागात शगुन चौकातील सिग्नल बंद असल्यामुळे शगुन चौक ते साई चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे दिसत होते. काल पाडवा आणि शनिवारी असलेल्या ईदमुळे पिंपरी बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्यांची संख्या वाढल्याने गुरुवारी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा वाहनचालकांना सामना करावा लागला

जवळच्या काही अंतरावर पिंपरी रेल्वे स्टेशन, मेट्रो स्टेशन असल्याने प्रवासी जवळच्या जवळ रस्त्यावर वाहने पार्किंग करतात. त्यामुळे येथील वाहतुकीची समस्या वाहनचालकांची डोकेदुखी ठरत आहे. शगुन चौकाबरोबरच पिंपरी मेट्रोस्टेशनपासून पिंपरीत जाणाऱ्या मार्गावरदेखील दोन्ही बाजूने वाहने पार्क केल्याने वाहनचालकांना वाहने चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

पिंपरी शहरातील डिलक्स चौक, राष्ट्रसंत गाडगेबाबा चौक, रिव्हर रोड, साई चौकातील रस्ते गर्दीने गजबजून गेले आहेत. दुसरीकडे रस्त्यावरील वाहनांची संख्याही वाढली आहे. पुणे, मुंबई, महामार्गावरील वाहने शगुन चौकातून पिंपरी, काळेवाडी, रहाटणी उपनगर रस्त्यावर जातात म्हणून वाहनांची संख्या वाढत चालली असून, पिंपरी बाजारपेठेत वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे येथील वाहतुकीचे नियमन करण्यासाठी सिग्नलची आवश्यकता आहे; परंतु ही सिग्नल यंत्रणा गेले कित्येक दिवस झाले बंद आहे, त्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे.

पिंपरी शहरातील डिलक्स चौक, राष्ट्रसंत गाडगेबाबा चौक, रिव्हर रोड, साई चौकातील रस्ते गर्दीने गजबजून गेले आहेत. दुसरीकडे रस्त्यावरील वाहनांची संख्याही वाढली आहे. पुणे, मुंबई, महामार्गावरील वाहने शगुन चौकातून पिंपरी, काळेवाडी, रहाटणी उपनगर रस्त्यावर जातात म्हणून वाहनांची संख्या वाढत चालली असून, पिंपरी बाजारपेठेत वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे येथील वाहतुकीचे नियमन करण्यासाठी सिग्नलची आवश्यकता आहे; परंतु ही सिग्नल यंत्रणा गेले कित्येक दिवस झाले बंद आहे, त्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे.



### रस्त्यावर वाहन पार्किंग

**» पिंपरी शहरातून जाणाऱ्या काळेवाडी, रहाटणी, थेरगाव, पिपरीगाव, पिंपळे सौदागर या मार्गांवर वाहनांची जास्त वर्दळ आहे. उपनगरांतील बहुतांश रस्ते पिंपरी बाजारपेठेत येऊन मिळतात. जवळच्या काही अंतरावर पिंपरी रेल्वे स्टेशन, मेट्रो स्टेशन असल्याने प्रवासी जवळच्या जवळ रस्त्यावर वाहने पार्किंग करतात. त्यामुळे येथील वाहतुकीची समस्या वाहनचालकांची डोकेदुखी ठरत आहे. शगुन चौकाबरोबरच पिंपरी मेट्रोस्टेशनपासून पिंपरीत जाणार्‍या मार्गावरदेखील दोन्ही बाजूने वाहने पार्क केल्याने वाहनचालकांना वाहने चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.**

**“ येत्या काही दिवसांत शगुन चौकातून पुढे बिजचे काम सुरू होणार असल्यामुळे ती सिग्नल यंत्रणा कायमची काढून टाकण्यात येणार आहे. सिग्नल यंत्रणा बसविणे सोयीस्कर नाही. तशी सूचना लवकरच देण्यात येणार आहे.**

**- अमित डोळस, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग, पिंपरी**

# 'एक प्रकल्प एक निविदा' धोरणामुळे कामांना गती

## नवीन पद्धतीमुळे वेळ, खर्च आणि गुणवत्ता यावर नियंत्रण; प्रकल्प वेळेत पूर्ण होणार

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या भवन रचना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मोठ्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत गती, पारदर्शकता आणि गुणवत्ता राखण्यासाठी निविदा प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. 'एक प्रकल्प – एक निविदा' या पद्धतीने एकत्रित प्रकल्प आराखडा तयार करून दीर्घकालीन निविदा प्रक्रिया लागू करण्याचे कार्यालयीन परिपत्रक महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रसिध्द केले आहे.




### गुणवत्ता आणि पारदर्शकता वाढणार

**» एकाच ठेकेदारामार्फत संपूर्ण प्रकल्प राबविल्यामुळे कामाची गुणवत्ता राखणे सोपे होणार आहे. तसेच तांत्रिक विसंगती टाळून कामात सातत्य राखले जाईल. पारदर्शक निविदा प्रक्रियेमुळे भ्रष्टाचारावरही आळा बसण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे महापालिकेचे प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण होतील, असा प्रशासनाचा विश्वास आहे.**

महापालिका हद्दीतील शाळा, स्मशानभूमी, रुग्णालये, नाट्यगृहे, भाजी मंडई, स्मारके, बहुउद्देशीय क्रीडा संकुले, महापालिकेच्या इमारती तसेच सामाजिक केंद्रांसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्ये सध्या दरवर्षी स्वतंत्र पूर्वगणनपत्रक व निविदा काढली जाते. या प्रक्रियेमुळे वेळेचा अपव्यय, तांत्रिक विसंगती तसेच खर्चात वाढ होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर ही सुधारित पद्धत लागू करण्यात आली आहे.

नवीन धोरणानुसार प्रकल्पाच्या सुरुवातीलाच संपूर्ण इमारतीचे पाया ते पूर्णत्वापर्यंत एकत्रित पूर्वगणनपत्रक तयार करून त्यास एकाच वेळी प्रशासकीय मान्यता आणि पूर्वगणनपत्रक मान्यता घेण्यात येणार आहे. त्यानंतर संपूर्ण प्रकल्पासाठी एकच निविदा प्रक्रिया राबवून पात्र ठेकेदाराची नियुक्ती केली जाणार आहे.

याशिवाय प्रकल्पाच्या एकूण खर्चासाठी महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम कलम ७२ (ब) अन्वये स्थायी समितीमार्फत मुख्य सभेची मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रकल्प पूर्णत्वास जावा यासाठी दरवर्षी अर्थसंकल्पातून आवश्यक निधी 'लॉक' करून उपलब्ध करून देण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

महापालिकेच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत भागनिहाय किंवा मजलानिहाय विभागणी करून स्वतंत्र पूर्वगणनपत्रक आणि निविदा प्रक्रिया राबविणे टाळण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांचे काटेकोर पालन केल्यास भवन रचना विभागातील प्रकल्प निश्चित कालावधीत पूर्ण होण्यास मदत होईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे.

### एकत्रित निविदा प्रक्रिया

**» महापालिकेने 'एक प्रकल्प – एक निविदा' ही नवीन पद्धत लागू करून प्रकल्पांच्या अंमलबजावणीत मोठा बदल केला आहे. याअंतर्गत प्रकल्पाच्या सुरुवातीलाच संपूर्ण आराखडा तयार करून एकाच निविदेद्वारे काम दिले जाणार आहे. यामुळे वारंवार निविदा काढण्याची गरज कमी होऊन वेळेची बचत होईल. तसेच प्रकल्पांची अंमलबजावणी अधिक सुसंगत आणि नियोजनबद्ध पद्धतीने होण्यास मदत होणार आहे..**

### खर्च आणि वेळेवर नियंत्रण

**» पूर्वी प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविल्यामुळे खर्च वाढत होता आणि प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब होत होता. नवीन धोरणामुळे संपूर्ण खर्चाचे नियोजन एकाच वेळी करण्यात येणार आहे. यामुळे आर्थिक शिस्त राखली जाईल आणि अनावश्यक खर्च टाळता येईल. तसेच निधी 'लॉक' करण्याच्या तरतुदीमुळे प्रकल्पांना आर्थिक स्थैर्य मिळणार आहे.**

# पुणे विमानतळावरून 50 हजार टनांहून अधिक मालवाहतूक

## देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना; निर्यातीत पुणे विमानतळाचे महत्त्व वाढले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विमानतळावरून दरमहा सरासरी 10 ते 15 मेट्रिक टन आंतरराष्ट्रीय, तर साडेतीन ते साडेचार हजार मेट्रिक टन देशांतर्गत मालवाहतूक होते. वार्षिक विचार करता, आंतरराष्ट्रीय स्तरावर 123 टन आणि देशांतर्गत 40 ते 50 हजार टन अशी एकूण 50 ते 51 हजार टनांच्या घरात मालवाहतूक येथून यशस्वीपणे पार पडते.



पुणे विमानतळ फक्त प्रवाशांच्या सेवेसाठीच नाही, तर जागतिक व्यापार आणि मालवाहतुकीचे (कार्गो) महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने पुढे येत आहे. दै. 'पुढारी'च्या प्रतिनिधीने पुणे विमानतळावरील कार्गो विभागाच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करीत विमानतळावरून होणारी मोठी उलाढाल आणि अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.

विमानतळाच्या कार्गो विभागातून प्रामुख्याने ताजी फळे, भाजीपाला, फुले आणि डे-ओल्ड चिक्स (कोंबड्यांची पिले) यांची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. यासोबतच टाटा मोटर्स, कॅटरपिलर, कमिन्स, महिंद्रा आणि मर्सडीजि यांसारख्या दिग्गज कंपन्यांचे ऑटो पार्ट्स येथून परदेशात पाठवले जातात. ई-कॉमर्स आणि पोस्ट ऑफिस कार्गोची सेवाही आता येथे सुरू झाली आहे.

पुणे विमानतळावरून दरमहा सरासरी 10 ते 15 मेट्रिक टन आंतरराष्ट्रीय, तर साडेतीन ते साडेचार हजार मेट्रिक टन देशांतर्गत मालवाहतूक होते. इनबाऊ ंड कार्गो, आऊटबाऊंड कार्गो, इम्पोर्ट आणि एक्स्पोर्ट कार्गो अशा चारही विभागांतील सुसूत्रता दिसून आली. मालाच्या तपासणीसाठी येथे अत्याधुनिक एक्स रे स्कॅनर मशिन्स, कुशल मनुष्यबळ आणि जलद वाहतुकीसाठी ट्रॉली वाहनांची चोख व्यवस्था असल्याचे दिसून आले. कस्टम विभाग आणि सुरक्षा यंत्रणांच्या कडक पहाऱ्यात प्रत्येक पार्सलची तपासणी केली जाते.

### एकाच दिवसातील मालवाहतूक

**» अवघ्या 24 तासांतील आकडेवारी पाहता, पुणे विमानतळावर 106.97 मेट्रिक टन माल आला (इनबाऊंड कार्गो), तर 90.14 मेट्रिक टन माल बाहेर (आऊटबाऊंड कार्गो) पाठवण्यात आला. यामध्ये 1,560 किलोग्रॅम आंतरराष्ट्रीय निर्यातीचा समावेश होता.**

**" पुणे विमानतळ कार्गो क्षमतेचा पूर्ण क्षमतेने वापर करत असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रक्रियेत वेग आला आहे. उद्योजक आणि शेतकऱ्यांसाठी ही व्यवस्था वरदान ठरत आहे. पुण्याच्या वाढत्या विस्तारामुळे कार्गोला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, आगामी काळात यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.**

**- संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ**

# कचऱ्याचे पाणी रस्त्यावर पडल्याने वाहनचालकांची कसरत

## लिचेट रस्त्यावर साचल्याने वाहनचालकांना धोका; तात्काळ उपाययोजनांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहरातील हॉटेलचा ओला कचरा संकलन तसेच घरोघरी कचरा संकलित झाल्यानंतर तो कचरा हस्तांतरण केंद्रावरून कचरा प्रकल्पाच्या ठिकाणी मोठ्या डंपरमधून नेला जातो.

मात्र, या डंपरमधून या कचऱ्यात असलेले तेलाचे पाणी तसेच कुजलेल्या कचऱ्यामधून निघणारे लिचेट रस्त्यावर पडत असल्याने, वाहने घसरण्याचे प्रकार लक्षणीय प्रमाणात वाढले असून महापालिका प्रशासनाने तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

याचा सर्वाधिक त्रास पौड रस्त्याने शहरात येताना कोथरूड कचरा डेपोच्या समोरील बाजूच्या मुख्य रस्त्यावर होत आहे. या ठिकाणी ओला कचरा असलेली वाहने थांबत असल्याने त्यांचे लिचेट रस्त्यावर येत असून वाहने घसरत असून नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.



### कचरा वाहतुकीत सुधारणा आवश्यक

» कचरा वाहतूक करताना बंदिस्त वाहनांचा वापर आणि ओला कचरा योग्य प्रकारे पिशव्यांमध्ये भरून नेणे आवश्यक असताना अनेक ठिकाणी नियमांकडे दुर्लक्ष होत आहे. कचऱ्यातील द्रवपदार्थ थेट रस्त्यावर सांडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे महापालिकेने तातडीने उपाययोजना करून कचरा वाहतूक पद्धतीत सुधारणा करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

महापालिकेकडून कचरा वाहतूक करताना ती बंदिस्त वाहतून तसेच लिचेट आणि कचऱ्याचे पाणी रस्त्यावर येणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. मात्र, अनेकदा वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये हा ओला कचरा बायोडीग्रेडेबल पिशव्यांमध्ये न भरता थेट वाहनात टाकला जातो.

परिणामी या कचऱ्यात असलेले पाणी तसेच तेल एकत्र होऊन ते वाहतुकीच्या वाहनातून रस्त्यावर पडत असून, रस्ता निसरडा होत आहे. तर, त्यावरून दुचाकी वाहने घसरल्याने नागरिकांना अपघाताचा सामना करावा लाग

### निसरड्या रस्त्यांमुळे अपघात वाढले

» महापालिकेकडून ओला कचरा वाहतूक करताना डंपरमधून गळणारे लिचेट आणि तेलकट पाणी रस्त्यावर पडत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः पौड रस्ता परिसरात, कोथरूड कचरा डेपोसमोर ही समस्या गंभीर बनली आहे. कचरा वाहने थांबल्यानंतर रस्त्यावर साचलेले घाण पाणी रस्ता निसरडा करत असून दुचाकीस्वार घसरून जखमी होण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

> ‘ओला कचरा बंदिस्त पद्धतीने घेऊन जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, हस्तांतरण करताना तो व्यवस्थित केला जाईल, रिकाम्या वाहनात कचरा राहणार नाही यासाठी सूचना देण्यात येतील. तसेच, वाहनातील पाणी नितळेपर्यंत ती जागेवरच थांबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.’
>
> \- अविनाश संकपाळ, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन

महापालिकेकडून शहरातील हॉटेलचा ओला कचरा संकलन तसेच घरोघरी कचरा संकलित झाल्यानंतर तो कचरा हस्तांतरण केंद्रावरून कचरा प्रकल्पाच्या ठिकाणी मोठ्या डंपरमधून नेला जातो.


मात्र, या डंपरमधून या कचऱ्यात असलेले तेलाचे पाणी तसेच कुजलेल्या कचऱ्यामधून निघणारे लिचेट रस्त्यावर पडत असल्याने, वाहने घसरण्याचे प्रकार लक्षणीय प्रमाणात वाढले असून महापालिका प्रशासनाने तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली जात आहे

# वडगाव शेरीतील जलतरण तलाव रखडला; पाच वर्षांनंतरही काम अपूर्ण

## निधीअभावी जलतरण प्रकल्प रखडला; परिसरात अस्वच्छता व नागरिकांची गैरसोय वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

येथील लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे जलतरण तलावाच्या कामाचे भूमिपूजन पाच वर्षांपूर्वी केले होते. परंतु, पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने या जलतरण तलावाचे काम अद्यापही रखडलेच आहे. परिसरात राडारोडा आणि कचऱ्याचे ढीग साचले आहेत. महापालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे



वडगाव शेरी परिसरातील नागरिकांसाठी जलतरण तलाव आणि स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स करण्यासाठी तीन कोटी रुपयांची तरतूद केली होती. या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये जीम आणि जलतरण तलावाची निर्मिती करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन पाच वर्षांपूर्वी करण्यात आले होते. त्यासाठी तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या तरतुदीतून तलावाच्या टाकीचे काही प्रमाणात काम करण्यात आले. पण, त्यानंतर आलेल्या कोरोनाच्या साथीमुळे या कामाला ब्रेक लागला. निधी उपलब्ध होत नसल्याने परिसरातील मोकळ्या जागेत कचरा आणि राडारोडा टाकला जात आहे

तलावाच्या टाकीचे काम देखील अपूर्ण असून, त्यामध्ये साचलेल्या पावसाच्या पाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे परिसरात डेंग्यू व मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. जलतरण तलावाच्या आवारात बांधकाम साहित्य टाकण्यात आले असून, नियमित साफसफाई होत नसल्याने परिसर अस्वच्छ झाला आहे. प्रवेशद्वाराच्या आतील व बाहेरील भागात कचरा साचल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरात महापालिकेचा जलतरण तलाव नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. दरम्यान, या

### नागरिकांची गैरसोय

» वडगाव शेरीमध्ये जलतरण तलावाची गरज आहे. जलतरण तलावाचे काम रखडल्याने नागरिकांनी येरवडा किंवा खराडी येथे महापालिकेच्या जलतरण तलावामध्ये पोहण्यासाठी जावे लागत आहे. वडगाव शेरीमध्ये खासगी जलतरण तलाव आहेत. पण, त्याचे शुल्क नागरिकांना परवडत नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते. यामुळे महापालिकेने या जलतरण तलावाचे काम तत्काळ पूर्ण गरजेचे असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

> गेल्या काळात जलतरण तलावाचे काम निधीअभावी रखडले होते. परंतु यंदाच्या बजेटमध्ये या कामासाठी 1.5 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. हे काम लवकरात काम सुरू करून येत्या दोन ते अडीच वर्षांमध्ये ते पूर्ण केले जाईल. संरक्षक भिंतींच्या कामाला प्राधान्य दिले जाईल.
>
> \- हनुमंत कलाटे, उपअभियंता, महापालिका

कामाच्या ठिकाणी मद्यपींचा वावर वाढला असून, परिसराला ‘ओपन बार’चे स्वरूप प्राप्त झाले आहे. मद्यपींचा उपद्रव सहन करावा लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले. महापालिका प्रशासनाचे हे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी होत आहे.